जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक १०.०६.२०२६**

‘‘ किरकोळ कारणावरून ज्येष्ठ नागरिकास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या ओला चालकास तात्काळ अटक ’’

दिनांक ०९/०६/२०२६ रोजी १९.०० वाजता चे सुमारास, श्री.सरोश दस्तुर, वय अंदाजे ७० वर्षे हे त्यांचे कुटूंबियासोबत विवियाना मॉल समोरून जात असताना तेथे स्विफ्ट कार क्र. MH 04-MR -5282 वरील चालक निशांत धर शुक्ला हा गाडीतुन बाहेर रस्त्यावर थुंकत असल्याने त्यास श्री.सरोश दस्तुर यांनी तुम्ही रस्त्यावर का थुंकतात असे बोलल्याने ओला चालक निशांत शुक्ला यास त्या गोष्टीचा राग आला व त्याने रागाच्या भरात श्री.सरोश दस्तुर यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून हाताने मारहान केली. तसेच जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने श्री.दस्तुर यांच्या डोक्यावर दगडाने व झाडाच्या फांदीने मारहान करून त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी ओला चालक आरोपीविरूध्द वर्तकनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. ४४५/२०२६ भा.न्या.सं.सन २०२३ चे कलम १०९, ३५२ प्रमाणे दाखल करण्यात आला असुन आरोपी ओला चालकास तात्काळ अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/गौरव राठोड नेम. वर्तकनगर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्तालय, ठाणे